TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH
Declared as Deemed to be University Under Section 3 of UGC Act 1956
Reaccredited by NAAC with 'B++' Grade
ISO 21001 : 2018 Certified

जा.क्र. प वि / २०२६/2360

दि. ५ फेब्रुवारी २०२६

# परिपत्रक

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ४४व्या पदवीप्रदान समारंभासाठी आपल्याला आमंत्रित करण्यात येत आहे. हा समारंभ शनीवार दि.१४ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे येथे आयोजित केला आहे. डिसेंबर २०२४ व मे २०२५ दरम्यान पदवी,पदविका अंतिम वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या प्रसंगी पदवी/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी कृपया खालील सूचनाची नोंद घ्यावी व त्याचे पालन करून सहकार्य करावे.

१ पदवीप्रदान समारंभाला येताना विद्यार्थ्यांनी आपल्यासोबत पदवीप्रमाणपत्राकरीता भरलेल्या शुल्काची मूळ पावती व पदवी/पदविकेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत आणावी. त्याशिवाय पदवी प्रमाणपत्र व उत्तरीय दिले जाणार नाही.

२ प्रमाणपत्र वाटपाची वेळ: सकाळी ८ ते १०

३ प्रमाणपत्र वाटपाचे ठिकाण: बी एफ ए विभाग टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे-३७

४ ज्या विद्यार्थ्यांनी पोस्टाद्वारे प्रमाणपत्राची मागणी केली आहे त्यांना ३० एप्रिल २०२६ अखेरपर्यंत पदवी प्रमाणपत्रे मिळतील. सदर विद्यार्थ्याना पदवी प्रदान समारंभाच्यावेळी प्रमाणपत्रे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५ विद्यार्थ्यांना जे उत्तरीय देण्यात येईल ते त्यांनी सदर समारंभ संपेपर्यंत परिधान करणे आवश्यक आहे.

६ डिसेंबर २०२४ व मे २०२५ परीक्षेव्यतिरिक्त पूर्वी झालेल्या परीक्षांमध्ये पदवी/पदविका उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सदर पदवीप्रदान समारंभानंतर स्पीडपोस्ट, रजिस्टर्ड पोस्ट द्वारे पदवीप्रमाणपत्रे पाठवण्यात येतील, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना पदवीप्रदान समारंभादिवशी पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही.

७ जर विद्यार्थी पदवी/पदविका प्रमाणपत्र स्विकारणेसाठी स्वत: हजर राहू शकत नसेल तर येणाऱ्या व्यक्तीजवळ पदवी/पदविका अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व शुल्क भरल्याचे चलन असणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेकडे त्याबाबत स्वतःच्या सहीने अधिकारपत्र दयावे व त्यामध्ये स्विकारणाऱ्या व्यक्तीचे नाव व मोबाईल क्रमांकाचा उल्लेख करावा. पदवी/पदविका प्रमाणपत्र स्विकारण्यासाठी येणाऱ्या व्यक्तीने आपले ओळखपत्र बरोबर आणावे. (उदा. आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, पारपत्र इत्यादींपैकी एकाची छायांकित प्रत.) अशा पद्धतीने अधिकारपत्र देऊन एखादी व्यक्ती पदवी प्रमाणपत्र घेऊन गेल्यास त्याची जबाबदारी विद्यापीठावर असणार नाही.

नोट : परीक्षा केंद्रावर परीक्षा दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रदान समारंभानंतर पोस्टाद्वारे प्रमाणपत्र देण्यात येतील. पदवी प्रदान समारंभ सुरु झाल्यावर पदवी प्रमाणपत्र वाटप बंद होईल याची नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक